प्रेसनोट दिनांक २९/०८/२०२३

**सिडको कार्यालय, नवी मुंबई येथील महाव्यवस्थापक (प्रशासन) तथा विभागीय अधिकारी, ऐरोली विभाग, नवी मुंबई ( अतिरीक्त कार्यभार ) यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| ठाणे दैनंदिनी नोंद क्मांक | :- | सीबीडी पो.स्टे. ठाणे दैनंदिनी नोंद क्मांक २७/१७:०३ वा. दि. २९/०८/२०२३ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | श्री जगदीश लक्ष्मणराव राठोड, वय ५३ वर्षे, महाव्यवस्थापक (प्रशासन) तथा विभागीय अधिकारी (अतिरीक्त कार्यभार), ऐरोली विभाग, सिडको, नवी मुंबई (वर्ग १) |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. १०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू.१०,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तक्रारदार इस्टेट एजंट असून त्यांचेकडे ऐरोली, नवी मुंबई येथील सदनिकेचे 'फस्ट पार्टी डिड ऑफ अपार्टमेंट' करारपत्रावर स्वाक्षरी करण्याकरीता लोकसेवक श्री. जगदीश राठोड हे रू.५,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक २९/०८/२०२३ रोजी ॲ. सी.बी. नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली होती.<br>प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९/०८/२०२३ रोजी शासकिय पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री. जगदीश राठोड यांनी तक्रारदार यांच्याकडे ऐरोली, नवी मुंबई येथील सदनिकेचे 'फस्ट पार्टी डिड ऑफ अपार्टमेंट' करारपत्रावर स्वाक्षरी करण्याकरीता रू. १०,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>दिनांक २९/०८/२०२३ रोजी लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. जगदीश राठोड यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू. १०,०००/- सिडको कार्यालय, ६वा मजला, प्रशासन विभाग येथे लोकसेवक यांच्या केबिनमध्ये स्विकारली असता, लोकसेवक श्री. जगदीश राठोड यांना १४:५२ वाजता लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

**मार्गदर्शन अधिकारी:- मा.श्री.सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**


संपर्क पत्ता :-ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेत स्थळ :-acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :-spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :-acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :-१०६४
दुरध्वनी क्र. :-०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
ॲसीबी, नवी मुंबई कार्यालय दुरध्वनी क. -२७८३३३४४/८३५५९०१४४७
व्हॉटस्ॲप क्र. :-९९३०९९७७००


Scanned with CamScanner